# महाराष्ट्र शासन
# ग्रामविकास व जलसंधारण विभाग
# जिल्हा जलसंधारण विभाग, जि.प.(ल.पा) वाशिम
## प्रसिध्दी पत्रक सुचना क्रमांक ०१ / २०१९-२०

## <u>शुध्दीपत्रक</u>

जिल्हा जलसंधारण विभाग जि.प (ल.पा) वाशिम विभागा मार्फत जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत नाला खोलीकरण व रुंदीकरणाच्या लोक सहभागातुन होणाऱ्या कामांकरीता खोदकामाचे दरपत्रक प्रसिद्धी सुचना क्र.०१/ २०१९-२० जा.क्र जावक क्रमांक.१२३६/नि.ली/दरपत्रक सु.क्र. ०१/२०१९-२०/दिनांकः-०८/०५/२०१९ नुसार मागविण्यात आले आहे. यात नमुद केलेल्या कामाचे संबधीत गावातील/तालुक्यातील/जिल्हयातील व्यक्तीकडे स्वतःच्या मालकीची यंत्रसामुग्री असलेल्या मशिनणारकांनी खालील कामाचे दरपत्रकामध्ये दर नमुद करुन (कमाल दर रु.२७/- प्रति घ.मी.) मोहोरबंद लिफाप्यामध्ये दिनांक ०८/०५/१९ ते दिनांक १४/०५/२०१९ वेळ दुपारी १४.०० वाजेपर्यत सादर करणे बाबत कळविले होते.

तथापी मानसुन कालावधीचे अनुषंगाने उर्वरित अत्यल्प कालावधीचा विचार करु जाता मा.जिल्हाधिकारी वाशिम यांचे दि.०९/०५/२०१९ रोजीचे प्राप्त सुचनांनुसार **<u>मशिनधारकांनी दरपत्रके सादर करण्याचा कालावधी कमी करुन दि.०८/०५/२०१९ ते दि.१०/०५/२०१९ - १७.०० वा पर्यंत ठेवण्यात येत आहे याची सर्वांनी नोंद घ्यावी.</u>**

कोरे दरपत्रकाची प्रत जिल्हा जलसंधारण अधिकारी जि.प(ल.पा) वाशिम या कार्यालयातुन दिनांक ०८/०५/१९ वेळ सकाळी १२.०० पासुन ते दिनांक १०/०५/२०१९ वेळ १७.०० वाजेपर्यत कार्यालयीन कामाकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत उपलब्ध करुन देण्यांत येईल. कार्यालयातुन उपलब्ध करुन दिलेल्या कोरे दरपत्रकामध्येच दर नमुद करुन दिनांकासहीत स्वाक्षरीसह मोहोरबंद लिफाप्यात पोक लेन / जे.सी.बी. मशिनचे पंजीकरण प्रमाणपत्राची प्रत (Regitration copy), pan Card, GST Registration, आधारकार्डाची प्रत इत्यादी दस्ता ऐवजाच्या छाया प्रतिसह दरपत्रक मोहोरबंद लिफाप्यात दिनांक १०/०५/२०१९ वेळ १७.०० वाजेपर्यत जिल्हा जलसंधारण विभाग, दुसरा माळा, नविन प्रशासकिय इमारत, काटा रोड, जिल्हा परीषद वाशिम येथे दिलेल्या वेळेत सादर करावे. सदर दरपत्रके १७.०० वाजता नंतर आलेल्याचा विचार करण्यांत येणार नाही याची दक्षता घेवुनच दरपत्रक सादर करावेत. शक्य झाल्यास त्याच दिवशी १७.१५ वाजता उघडण्यांत येईल.

—स्वा—
(श्री.ऐ.एम.खान)
जिल्हा जलसंधारण अधिकारी
जि.प(ल.पा) वाशिम

—स्वा—
(श्री.के.आर.तापी)
अति.मुख्य कार्यकारी अधिकारी
जि.प वाशिम

Scanned by CamScanner